# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा व कलावंत मेळावा.

प्रतिवर्षी नाटककार गो. ब. देवल यांच्या स्मृतिप्रित्यर्थ १४ जून रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात येते. या वर्षी पुरस्कारांची पूनर्रचना करण्यात आली असून ६९ पुरस्कारांची पूनर्रचना करून एकूण ३८ पुरस्कार देण्यात आले. या वर्षीपासून हा सोहळा दोन भागात घेण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे दिनांक १४ जून आणि ८ नोव्हेंबर २०१५ या दोन दिवशी हा सोहळा सादर करण्यात आला. दिनांक १४ जून २०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता निवेदिता, चंद्रपूर यांचे 'चिंधी बाजार' हे हौशी राज्य नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीतील प्रथम पुरस्कार विजेते नाटक सादर करण्यात आले. दु. ३.०० वाजता 'संगीत स्वयंवर' नाटकाला शंभर वर्ष पूर्ण झाल्याबद्दल राधाकृष्ण कलामंच, रत्नागिरी यांचे 'संगीत स्वयंवर' नाटक सादर करण्यात आले. त्यानंतर सायं. ७.०० वा. पुरस्कार वितरण सोहळा आणि कार्तिकी गायकवाड, प्रथमेश लघाटे, मुग्धा वैशंपायन आणि मधुरा दातार यांचा गायनाचा कार्यक्रम सादर केला. श्री. जयंत सावरकर आणि श्रीमती सुलभा देशपांडे याना जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला. त्यांना देण्यात आलेल्या पुरस्काराची रक्कम प्रत्येकी रू. २५०००/- त्यांनी नाट्यपरिषदेला देणगी म्हणून दिली. श्री. गुरूनाथ दळवी यांनी मिळालेल्या रू. ५०००/-पुरस्कारामध्ये वैयक्तिक रू. ५०००/- भरून एकूण रू. १००००/- देणगी नाट्यपरिषदेला दिली. तसेच नामवंत कलावंतांचे पारितोषिके देवून सन्मान करण्यात आले. या सोहळ्याला रंगभूमीवरील बहुसंख्य रंगकर्मी उपस्थित होते.

रंगभूमी दिनाचे औचित्य साधून पुरस्कार विवरण समारंभाचे दुसरे सत्र दिनांक ८ नोव्हेंबर २०१५ रोजी संपन्न झाले. सकाळी १०.३० वाजल्यापासून सायं. ६.०० वाजेपर्यंत नाट्यपरिषदेच्या बारा शाखांचे मनोरंजनाचे विविध कार्यक्रम आणि पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला.

## नाट्यलेखन स्पर्धा

९५ व्या नाट्य संमेलनाच्या निमित्ताने रंगभूमीच्या अभिवृद्धिसाठी नाट्यलेखन स्पर्धा आयोजित केली होती. त्यात एकूण ३४ संहिता पाठविण्यात आल्या होत्या. या स्पर्धेचे परिक्षक म्हणून डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली, श्री. दत्ता पाटील आणि श्री. नितीन नायगांवकर यांनी काम पाहिले. दिनांक ८ नोव्हेंबर २०१५ रोजी पुरस्कार वितरण सोहळ्यात नाट्यलेखन स्पर्धेतील विजेत्यांना पुरस्कार देण्यात आले. नाट्यलेखन स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे :

द्वितीय क्रमांक रू. ११,०००/- आणि प्रशस्तीपत्रक नाटक - संगीत समेट-श्री. वसंत प. केतकर

तृतीय क्रमांक रू. ७,०००/- (विभागून) आणि प्रशस्तीपत्रक नाटक - संगीत डब्बल लाईफ - श्री. रविंद्र भगवते

नाटक - मुखवटा - श्री. कुमार बडगुजर

उत्तेजनार्थ - नाटक - एका उत्तराची कहाणी, श्री. अरविंद लिमये

परिक्षकांनी एकमताने प्रथम क्रमाकांची निवड केली नाही. प्रतिवर्षी नाट्य संमेलनाचा उपक्रम म्हणून घेण्यात येणाऱ्या नाट्यलेखन स्पर्धेतील नाट्यसंहितांची बँन्क तयार करण्यात आली असून ज्यांना नाट्यसंहिता वाचावयाची असेल त्यांना ती कार्यालयीन वेळेत कार्यालयात बसून वाचता येते व प्रत हवी असल्यास लेखकाच्या परवानगीने ती उपलब्ध होवू शकते.

## नाट्य अभिनय, तंत्र विषयक कार्यशाळा

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेतर्फे दिनांक २७ जून २०१५ ते दिनांक ११ जुलै २०१५ या कालावधीत नाट्य अभिनय, तंत्र विषयक कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेत २४ शिबीरार्थी सहभागी झाले होते. या कार्यशाळेत लेखन,